UNDER INSTRUCTIONS OF THE

**Chief Materials Manager**

FOR AND ON BEHALF OF

# Brihan Mumbai Electric Supply & Transport Undertaking

(Of The Brihanmumbai Mahanagarpalika)

**E – AUCTION NO. (9)**

**E-auction on 1st September, 2016**

Between

**9:30 Hrs. to 13:30 Hrs.**

**And**

**Extended E-auction on 1st September, 2016**

Between

**15.00 Hrs to 15.30 Hrs**

At

On A Portal

**www.ashvinauctioneers.com**

**Inspection On**

**29th, 30th & 31st August, 2016**

**Between 9.00 Hrs. to 17.00 Hrs**

**at**

Oshiwara Scrap Yard, Anik Depot & Dharavi Depot.


ASHVIN & CO.

(AUCTIONEERS)

**Office : 3/B, Samkit, New Vikas Grih Road, Paldi,**
**Ahmedabad - 380 007. 9820739509 / 9898108070**
**Br. O.: B/314, Shyam Kamal CHS, Agarwal Market, Vile Parle (E),**
**Mumbai - 400 057. Tel: 26107515 Tel.Fax. 2613 3600**
**M : 9820133274 / 9376125968**
**E-mail : info@ashvinauctioneers.com / ashvinshah33@hotmail.com**

# मुख्य सामग्री व्यवस्थापक

यांच्या आदेशावरुन

## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

यांच्यासाठी आणि यांच्याकरिता

## इ-लिलाव क्रमांक (९)

**इ-लिलाव दिनांक : १ सप्टेंबर, २०१६**

९.३० वा ते १३.३० वा.

या वेळेदरम्यान

आणि

**विस्तारित इ-लिलाव दिनांक : १ सप्टेंबर,२०१६**

१५.०० वा. ते १५.३० वा.

या वेळेदरम्यान

**www.ashvinauctioneers.com या संकेतस्थळावर.**

**तपासणी दिनांक**

**२९, ३० व ३१ सप्टेंबर, २०१६**

९.०० वा. ते १७.०० वा. च्या दरम्यान

ओशिवरा मोडमाल आवार, आणिक आगार आणि धारावी आगार येथे.

# अश्विन ॲण्ड कंपनी

(लिलावदार)


कार्यालय - ३/बी, समकिट, न्यु विकास ग्रीह रोड, पलडी,
अहमदाबाद – ३८०००७. ९८२०७३९५०९, ९८९८१०८०७०

शाखा कार्यालय - बी/ ३१४, शाम कमल को.ऑप.हौ.सो.,
अगरवाल मार्केट, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७
दूरध्वनी : २६१०७५१५ टेलीफॅक्स् : २६१३३६००
भ्रमणध्वनी : ९८२०१३३२७४, ९३७६१२५९६८

संकेत स्थळ – **info@ashvinauctioneers.com / ashvinshah33@hotmail.com**

# THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
## (OF THE BRIHAN MUMBAI MAHANAGARPALIKA)

## SPECIAL CONDITIONS OF SALE

1. The intending bidders will have to deposit Refundable Caution Money Deposit (CMD) as specified in catalogue in the form of **D/D, pay order drawn in favour of the B.E.S. & T. Undertaking payable at Mumbai on or before one day earlier of the date of auction in the office of auctioneers Ashvin & Co.**

2. **User ID - password and confirmation for acceptance of bid will be sent to the bidder on the E – Mail Address given by him. The bidder is solemnly responsible for the misuse of their User ID and Password, therefore, necessary care should be taken by the bidder. The Date & Time for E-AUCTION is mentioned in the catalogue.**

3. **The successful bidder has to pay not less than 33.33% of the amount of the bid or Rs.10,000/- whichever is more** shall have to be made by the successful bidder as Earnest Money on acceptance of the bid, with Auctioneers, **on or before the date & time specified in the catalogue** in the form of Demand Draft / Pay Orders in favour of The **"B.E.S.& T. Undertaking"** payable at Mumbai, failing which the **CMD or equivalent cost of such materials, sold at the rate in the previous auction, whichever is less, shall be forfeited, further subject to minimum amount of Rs. 10,000/-.** In case, the bid amount is less than Rs.**10,000/-**, the successful bidder shall have to pay full amount.

4. Every bidder who is attending the auction will not be permitted to represent more than one firm.

5. **Unsold items will be put up for sale in Extended e-auction on the same working day of the e-auction between 15:00 hrs to 15:30 hrs and the minimum shall start from the highest bid received for the particular unsold item on the previous auction.**

6. It should be noted that the Chief Materials Manager/the Officer superintending the auction of B.E.S. & T. Undertaking reserves the right of sell the items individually or in lots what so manner.

7. Payment of 66.67% value of the materials must be paid by the successful bidder with B.E.S. & T. Undertaking on or before the date as specified in catalogues and the materials must be removed on or before the date as specified in catalogue. To fix the appointment for taking delivery of the material, the bidder should approach the MMO (Sales), Oshiwara Scrap Yard, immediately on the same day after payment of balance amount.

8. Interest @ 2% per month as specified in the general conditions of sale at Clause 2 (e) will be levied for delayed payment.

9. **Payment of 66.67% value and Sales Tax upto Rs. 5,000/= (RUPEES FIVE THOUSAND ONLY) will be accepted by B.E.S. & T. Undertaking in cash and above Rs. 5,000/= will be accepted by B.E.S. & T. Undertaking from the successful buyers in the form of Demand Draft in favour of the "B.E.S. & T. Undertaking" payable at Mumbai, during the working hours strictly between 9.30 hrs to 12.30 hrs and 13.30 hrs to 15.00 hrs. However demand draft /Pay Order will be accepted upto 16.00 hrs**.

10. If the bidders requiring the facility for payment and delivery in case of sale of big lots should state so preferably before the announcement of the bid for that particular item. The extent of the facility to be granted will be at the complete discretion of the panel of officers of B.E.S. & T. Undertaking superintending the sale.

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**

**(बृहन्मुंबई महानगरपालिका)**

## विक्री करण्याबाबतच्या विशेष शर्ती

१. उपक्रमाकडून लिलावाच्या माध्यमातून विक्री करण्यात येणा-या सामग्रीची खरेदी करण्यासाठी जे बोलीदार इच्छुक आहेत अशा बोलीदारांनी अश्विन अॅण्ड कं. या लिलावदाराच्या कार्यालयामध्ये लिलावाच्या दिवशी किंवा लिलावाच्या नियत दिनांकापूर्वी बेस्ट उपक्रम मुंबई यांचे नावे देय असलेला दर्शनी धनाकर्ष, प्रदानादेश या स्वरुपामध्ये सूचीमध्ये विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे, **परतावायोग्य तारण धन ठेव रक्कम (सीएमडी) जमा करणे आवश्यक असेल.**

२. **बोलीदाराचा ‘युझर आयडी-पासवर्ड’ आणि बोली स्वीकारल्याबाबतची पुष्टी, या संदर्भातील बोलीदाराने दिलेल्या इ-मेल पत्त्यावर पाठविण्यात येईल. प्रस्तुत बोलीदार, त्यांचा युझर आयडी तसेच पासवर्ड याबाबत गैरवापर झाल्यास त्या संदर्भात हे बोलीदार सर्वस्वी जबाबदार राहतील. यास्तव, सदर बोलीदाराला या संदर्भात योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे. इ-लिलावाबाबतचा दिनांक आणि वेळ, या संदर्भातील तपशील सुचीमध्ये नमूद करण्यात आला आहे.**

३. बोलीदाराने बोली स्वीकारल्यानंतर अशा यशस्वी बोलीदाराला **सुचीमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या दिनांकास आणि वेळेमध्ये किंवा त्या पूर्वीच्या दिनांकास,** बोलीच्या रकमेच्या ३३.३३ टक्क्यांहून कमी नसलेल्या रकमेचे प्रदान अथवा रु.१०,०००/- यापैकी जी रक्कम अधिक असेल एवढ्या रकमेचे प्रदान, **बेस्ट उपक्रमाच्या** नावे मुंबई येथे देय असलेला दर्शनी धनाकर्ष /प्रदानादेश या स्वरुपात लिलावदाराकडे जमा करणे आवश्यक असेल. बोलीदाराने सदर रकमेचे प्रदान केले नाही तर, **तारण धन ठेव (सीएमडी) किंवा मागील लिलावामध्ये ज्या दराने या सामग्रीची विक्री करण्यात आली होती तेवढी रक्कम, यापैकी जी रक्कम कमी असेल त्याप्रमाणे, कमीतकमी रु.१०,०००/-** एवढ्या रकमेच्या अधीन ठेवून, त्यानुसार याबाबतीतील रक्कम जप्त करण्यात येईल. या संदर्भात जर बोलीची रक्कम **रु.१०,०००/-** पेक्षा कमी असेल तर यशस्वी बोलीदाराला संपूर्ण रकमेचे प्रदान करावे लागेल.

४. जे बोलीदार लिलावामध्ये उपस्थित राहतात अशा प्रत्येक बोलीदाराला एकापेक्षा अधिक व्यवसायसंस्थेचे प्रतिनिधित्व करण्याकरिता मुभा देण्यात येणार नाही.

५. **लिलावाअंतर्गत सर्व विभागांमध्ये सामग्रीचा लिलाव करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सामग्रीपैकी ज्या विभागातील सामग्रीची लिलावाअंतर्गत विक्री झाली नाही अशा सर्व विभागातील विक्री न झालेल्या संचांचा त्याच दिवशी १५.०० ते १५.३० या दरम्यानच्या वेळेत पुन्हाः विस्तारीत इ-लिलाव करण्यात येईल आणि मागील लिलावामध्ये विक्री न झालेल्या विशिष्ट बाबीकरिता जी उच्चतम बोली प्राप्त झाली त्या बोलीपासून कमीत कमी बोली सुरुवात करण्यात येईल.**

६. येथे अशी नोंद घेणे आवश्यक आहे की, बेस्ट उपक्रमाचे मुख्य सामग्री व्यवस्थापक, सामग्रीचा लिलाव करण्याबाबतच्या कार्यपध्दतीवर देखरेख करणारे उपक्रमाचे अधिकारी हे प्रस्तुत बाबींची व्यक्तीगत किंवा संचामध्ये, जशी बाब असेल त्याप्रमाणे, विक्री करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

७. यशस्वी बोलीदाराने, सूचीमध्ये विनिर्दिष्टित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बेस्ट उपक्रमाकडे सामग्रीचे ६६.६७% एवढ्या मुल्यानुसार जी रक्कम येईल त्याबाबतचे प्रदान करणे आवश्यक आहे. तसेच सूचीमध्ये विनिर्दिष्टित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी सामग्री हलविणे देखील आवश्यक आहे. बोलीदाराने, शिल्लक रकमेचे प्रदान केल्यानंतर सामग्रीचा ताबा घेण्याकरिता भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी सामग्री व्यवस्थापन अधिकारी (विक्री), ओशिवरा मोडमाल आवार यांच्याकडे त्याच दिवशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

८. या संदर्भात कलम २ (इ) मध्ये विक्रीबाबतच्या सर्वसाधारण शर्तीमध्ये विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे, विलंब प्रदानाकरिता दरमहा २ टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल.

९. **यशस्वी बोलीदाराकडून रुपये ५०००/- (पाच हजार रुपये) पर्यंतचे सामग्रीचे मुल्य आणि विक्रीकर रोखीच्या स्वरुपात उपक्रमाकडून स्वीकारण्यात येईल. परंतु सदर रक्कम रु.५,०००/- पेक्षा जास्त असल्यास ती यशस्वी बोलीदाराकडून, बेस्ट उपक्रमाच्या नावाने मुंबई येथे देय असलेल्या दर्शनी धनाकर्ष/प्रदानादेश या स्वरुपात सकाळी ९.३० ते १२.३० आणि दुपारी १३.३० ते १५.०० च्या दरम्यान बेस्ट उपक्रमाकडून स्वीकारण्यात येईल. तसेच फक्त दर्शनी धनाकर्ष/प्रदानादेश सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत स्वीकारण्यात येतील.**

१०. मोठ्या प्रमाणातील संचाअंतर्गत असलेल्या परिमाणाच्या बाबतीतील प्रदान करणे आणि ताबा घेणे याबाबतची सुविधा जर बोलीदाराला आवश्यक असेल तर त्यांनी त्या विशिष्ट बाबीकरिता बोली जाहीर होण्यापूर्वी त्वरीत त्यानुसार नमूद करणे आवश्यक आहे. सामग्रीची विक्री करण्याकरिता बेस्ट उपक्रमाचे जे अधिकारी देखरेख करीत असतात ते संपूर्णतः त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार या संदर्भातील सुविधा देण्यात येईल.

11. In case, any facility in payment and delivery is extended to the successful bidder, he will have to fill up and sign the Declaration Form immediately and it will be the duty of the successful bidder to ensure the same.

12. Ground rent as specified in Clause (9) of the general condition of sale will be charged.

13. In the event of failure to keep fixed appointment for taking the delivery of materials, the charges of Rs.1,000/= will be charged, per failure, irrespective of material cost.

14. Only scrap D.D. Buses and Bus Bodies of D.D./S.D. buses in scrap condition will be allowed to be dismantled at the premises of B.E.S. & T. Undertaking.

15. S.D. buses/vehicles will not be allowed to be dismantled in the premises of B.E.S. & T. Undertaking and the same will have to be towed out only after producing permission & or cancellation of registration from the concerned RTO authority. An amount equivalent to 5% of the bid amount will be retained till the transfer documents are submitted by the bidder.

16. In case the reduction in quantity/ies of item/s refund will be made by B.E.S. & T. Undertaking on pro-rata basis of book value of the item/s so concerned.

17. In case, the actual quantity exceeds the announced quantity, the purchaser may at the option of B.E.S. & T. Undertaking take delivery of the said excess quantity upto 40% of the quantity announced, on payment of the same rate at which the bid has been accepted. As far as possible 90% of the quantity announced in the auction would be delivered to the purchaser in case the shortage is found to be more than 10%.

18. Duties, Taxes and Other Statutory Levies, if applicable will be charged at the appropriate rates. If any bidder is eligible for concessional rate / reduced rate of Income tax, he has to inform / declare the same on the auction day itself by submitting necessary documentary valid evidence for such concessions from concerned tax authorities. In case of concessional 'C' From facility, the bidder has to initially make full payment of sale value along with VAT and Income tax amounts, as applicable, and thereafter they can claim the concessional VAT amount from the concerned Regional Tax Authorities on their own.

19. The Auctioneers can collect maximum Rs.1000/- per year towards, subscription / registration charges / fees from prospective bidders being their policy.

## GENERAL CONDITIONS OF SALE BY AUCTION

### 1. RIGHT OF ACCEPTANCE OR REJECTION OF BIDS

Subject to realisation of Reserve prices where the B.E.S. & T. Committee of the Municipal Corporation of Brihan Mumbai has fixed the same or persons duly authorized by it in this behalf, all sales shall be made to the highest bidder. The bid, if accepted, shall be registered in the name of the actual bidder and he shall be responsible to the Municipal Corporation of Brihan Mumbai (hereinafter called the Corporation) for any loss etc. which might accrue to the Corporation as a result of his not completing the sale as bid. In the event of any dispute between bidders, the dispute shall be decide by the Officer of the B.E.S.& T. Undertaking superintending the sale and the lot or lots in question reauctioned at his discretion. His decision as to such acceptance shall be final and binding on all persons offering bids at the auction.

The auctioneer in consultation with Officer of the Corporation B.E.S. & T. Undertaking superintending the auction may refuse to accept the bids of any bidder/s without assigning any reasons.

### 2. PAYMENT FOR ACCEPTED BIDS

**a)** Payments of not less than 33.33% of the amount of the bid or Rs. 10,000/- whichever is more shall have to be made by the successful bidder as earnest money on acceptance of the bid, with auctioneers, **on or before the date & time as specified in the catalogue** in the form of Demand Draft / Pay Orders in favour of "The B.E.S. & T. Undertaking" payable at Mumbai, failing which the CMD shall be forfeited. In case, the bid amount is less than Rs. 10,000/-, the successful bidder shall have to pay full amount. The auctioneer, may, however without assigning any reasons, demand an earnest money, a higher percentage upto the full amount of the bid, immediately after the lot is knocked down. In doing so he shall in all cases act in accordance with any direction given by the officer of the B.E.S. & T. Undertaking supervising the auction.

**b)** After accepting bids and communicated by the auctioneer to the bidder, If the bidder fails to pay the earnest money required the bid shall forthwith be cancelled including the forfeiture of CMD. The Corporation B.E.S. & T. Undertaking reserves the right to take such action against the bidder as may be authorised by Law.

यशस्वी बोलीदाराला प्रदान आणि सामग्रीचा ताबा या संदर्भातील कोणतीही सुविधा देण्यात आली तर, यशस्वी बोलीदाराने त्वरीत प्रतिज्ञा-प्रपत्रामध्ये तपशील नमूद करुन त्यावर स्वाक्षरी करुन त्याबाबतची खातरजमा करणे, हे यशस्वी बोलीदाराचे कर्तव्य आहे.

सामग्रीच्या विक्री बाबतच्या सर्वसाधारण शर्तीच्या कलम (९) मध्ये विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे भू-भाडे आकारण्यात येईल.

सामग्रीचा ताबा घेण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेमध्ये बोलीदाराला उपक्रमाच्या मोडमाल आवारामध्ये उपस्थित राहता आले नाही तर, सामग्रीचे मूल्य विचारात न घेता, प्रत्येक प्रसंगी रु.१,०००/- याप्रमाणे सुधारित आकार लागू करण्यात येतो.

मोडीत स्थितीमधील केवळ मोडीत दुमजली बसगाडया आणि दुमजली/एकमजली बसगाड्यांचे सांगाडे बेस्ट उपक्रमाच्या जागांमध्ये सुटे करण्यास मान्यता देण्यात येईल.

बेस्ट उपक्रमाच्या जागेमध्ये एकमजली बसगाड्यांचे/ वाहनांचे भाग सुटे करण्यास परवानगी देण्यात येणार नाही आणि संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाची (आरटीओ) परवानगी सादर केल्यानंतर किंवा बसगाड्यांची नोंदणी रद्द केल्यानंतर सदर बसगाड्या मोडमाल आवाराच्या बाहेर घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येईल. सदर बोलीदाराकडून या संदर्भातील दस्तऐवज हस्तांतरीत करण्यात येत नाहीत तोपर्यंत बोली रकमेच्या ५% एवढी रक्कम उपक्रमाकडे ठेऊन घेण्यात येईल.

लिलावाअंतर्गत विक्री केलेल्या बाबीचे परिमाण/बाबींची परिमाणे यामध्ये जर कोणत्याही स्वरुपात घट झाली तर अशा बाबतीत संबंधित बाबी/बाबींच्या पुस्तकी मुल्याच्या आधारे बेस्ट उपक्रमाकडून यथाप्रमाण तत्वावर रकमेचा परतावा देण्यात येईल.

घोषित केलेल्या परिमाणापेक्षा जर प्रत्यक्ष परिमाण अधिक असेल तर अशा बाबतीत, बोली ज्या दराने स्वीकारण्यात आली आहे त्याच दराने त्यानुसार रकमेचे प्रदान केल्यानंतर, घोषित केलेल्या परिमाणाच्या ४० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त परिमाणाचा बेस्ट उपक्रमाच्या निवडीने खरेदीदाराला ताबा घेता येईल. लिलावांतर्गत विक्री करण्यात आलेल्या सामग्रीमध्ये जर १० टक्क्यांहून अधिक तूट आढळली तर अशा बाबतीत, लिलावामध्ये घोषित केलेल्या परिमाणाच्या शक्यतो ९० टक्के परिमाणाचा ताबा देण्यात येईल.

लिलावांतर्गत विक्री करण्यात आलेल्या सामग्रीच्या बाबतीत शुल्के, कर आणि अन्य सांविधिक शुल्के जर लागू असतील तर यथोचित दराने ते आकारण्यात येतील. कोणत्याही बोलीदाराला जर आयकर प्रदानाच्या बाबतीत सवलतीच्या दराने/कमी दराने कराचे प्रदान करण्यास ते पात्र असल्यास त्यांनी संबंधित कर प्राधिकरणाकडून अशा स्वरुपामध्ये जी सवलत मिळविण्याकरिता त्याबाबत आवश्यक ती दस्तऐवजाच्या स्वरुपामध्ये वैध पुरावा सादर करुन लिलावाच्या दिवशी या संदर्भात लिलावदाराला कळवावे लागेल/घोषित करावे लागेल. सवलतीच्या दराने विक्रीकराचे प्रदान (सी फॉर्म) करण्याच्या बाबतीत बोलीदाराने सुरुवातीला पुर्ण विक्रीची रक्कम विक्रीकर (व्हॅट) / आयकरासह भरणे आवश्यक आहे आणि तद्नंतर सदर सवलतीची जी रक्कम लागू असेल ती बोलीदाराने परत मिळविण्यासाठी त्यांच्या संबंधित प्रादेशिक कर प्राधिकरणाकडे स्वतः प्रयत्न करावे.

लिलावदार त्यांच्या धोरणानुसार संभाव्य बोलीदाराकडून प्रतिवर्षी रु.१,०००/- पेक्षा जास्त नसलेली रक्कम नोंदणीशुल्क/ वर्गणीच्या स्वरुपात घेऊ शकतो.

**<u>लिलावाच्या माध्यमातून विक्री करण्यात येणा-या सामग्रीच्या बाबतीतील सर्वसाधारण शर्ती</u>**

**<u>बोली स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट समितीने किंवा त्यांच्यावतीने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तींनी राखीव किंमती निश्चित केल्या आहेत, अशा राखीव किंमती प्राप्त होण्याच्या अधीन ठेवून, सर्व सामग्रीची विक्री उच्चतर बोलीदारास करण्यात यावी. सदर बोली, स्वीकारण्यात आल्यास ती प्रत्यक्ष बोलीदाराच्या नावाने नोंदणीकृत करण्यात येईल आणि या बोलीदाराने बोली म्हणून विक्रीची पूर्तता केली नाही तर परिणामी महापालिकेस (त्यापुढे महानगरपालिका म्हणून संबोधिण्यात येईल) प्राप्त होणा-या रकमेच्या कोणत्याही नुकसानीकरिता प्रस्तुत बोलीदार बृहन्मुंबई महानगरपालिकेस जबाबदार राहतील. बोलीदारांच्यामधील कोणत्याही वादाच्या प्रसंगी विक्रीची देखरेख करणा-या बेस्ट उपक्रमाच्या अधिका-याकडून सदर विवादाबाबत निर्णय घेण्यात येईल आणि या अधिका-याच्या स्वेच्छानिर्णयाने संबंधित संच किंवा संचाचा पुर्न:लिलाव करण्यात येईल. या अधिका-याचा सामग्रीचा पुर्न:लिलाव करण्याबाबतची निर्णयाची स्वीकृती ही अंतिम असेल व लिलावाच्या ठिकाणी बोली देऊ करणा-या सर्व व्यक्तींवर ती बंधनकारक असेल. लिलावासंदर्भात उपक्रमाचे जे अधिकारी देखरेख करतात त्यांच्यासमवेत लिलावदार विचारविनिमय करु शकतील आणि त्यानुसार कोणतेही कारण नमूद न करता कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींची बोली स्वीकारण्यास ते नकार देऊ शकतात.

**<u>स्वीकारण्यात आलेल्या बोलींकरिता प्रदान</u>**

ए) यशस्वी बोलीदाराने बोली स्वीकारल्यानंतर इसारा ठेव रक्कम म्हणून, बोली रकमेच्या कमीत-कमी ३३.३३ टवके रक्कम किंवा रु.१०,०००/-, यापैकी जी अधिक असेल तेवढी रक्कम, **सूचीमध्ये विनिर्दिष्टित केलेला दिनांक व वेळ किंवा त्यापूर्वी**, बेस्ट उपक्रमाच्या नावे मुंबई येथे देय असलेला दर्शनी धनाकर्ष/प्रदानादेश या स्वरुपामध्ये यशस्वी बोलीदाराला प्रदान करावे लागेल, अन्यथा बोलीदाराची तारण धन ठेव रक्कम जप्त करण्यात येईल. बोलीची रक्कम जर रु.१०,०००/- पेक्षा कमी असेल तर यशस्वी बोलीदाराला संपूर्ण रकमेचे प्रदान करावे लागेल. तथापि, लिलावदार कोणतेही कारण नमूद न करता, बोलीदाराकडे त्वरित बोलीच्या संपूर्ण रकमेपर्यंत उच्चतर टक्केवारीने इसारा ठेव रक्कम म्हणून मागणी करेल. अशा स्वरुपाच्या कार्यपध्दतीचा अवलंब केल्याने, लिलावावर देखरेख करणा-या बेस्ट उपक्रमाच्या अधिका-याने दिलेल्या कोणत्याही निर्देशानुसार सर्व प्रकरणांमध्ये प्रस्तुत लिलावदार कार्यवाही करेल.

बी) बोली स्वीकारल्यानंतर आणि यासंदर्भात लिलावदाराने बोलीदाराला कळविल्यानंतर, जर बोलीदाराने बोलीकरिता आवश्यक असलेल्या इसारा ठेव रकमेचे प्रदान केले नाही तर, तारण धन ठेव रक्कम जप्त करण्यासहित प्रस्तुत बोली तात्काळ रद्द करण्यात येईल. बेस्ट उपक्रम हा कायद्याने प्राधिकृत केल्यानुसार बोलीदाराविरुद्ध अशी कार्यवाही करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

सी) लिलावाच्या ठिकाणी स्वीकारण्यात आलेल्या बोलीअंतर्गत शिल्लक राहिलेले मूल्य रक्कम खरेदीदार लिलावदाराकडे रोखीच्या स्वरुपात किंवा बेस्ट उपक्रमाच्या ओशिवरा मोडमाल आवारामध्ये **<u>विस्तारित इ-लिलावाच्या दिनांकापासून ६ (सहा) कामाच्या दिवसामध्ये</u>** किंवा सूचीमध्ये विनिर्दिष्टित केलेल्या दिनांकापूर्वी रोखीच्या स्वरुपात प्रदान करेल. यशस्वी बोलीदाराने संपूर्ण विक्री मूल्य प्रदान केल्याबाबतची पावती (पावत्या) सादर केल्यानंतरच बेस्ट उपक्रमाकडून लिलावांतर्गत विक्री केलेल्या सामग्रीकरिता विक्री आदेश केवळ जारी करण्यात येईल.

**c)** Balance of the value of the bids accepted on the spot will be paid by the buyer in cash to the auctioneer at the time of the sale or at our Oshiwara Scrap Yard of the B.E.S. & T. Undertaking of the Corporation within **6 (six) working days from the date of Extended E-auction** or on or before the date specified in the catalogue. Sale release order for the goods shall only be issued by the B.E.S. & T. Undertaking only on the production of receipt(s) for the full sale value by the successful bidder.

**d)** In the event of failure to complete the payment of the balance sale value of any lot purchased by the bidder within the stipulated period, the sale of such lot shall be cancelled, the earnest money shall be forfeited with all his rights for which he gave the bid and paid the earnest money of the bid.

**e)** "Notwithstanding anything contained in Clause (d) above, the Chief Materials Manager, B.E.S. & T. Undertaking may in his absolute discretion allow the successful bidder to pay the balance 66.67% of the sale value beyond the stipulated period, if considered necessary by levying the penalty of 2% (Two Percent) per month on pro-rata basis for such late payments subject to the cost of storage and warehousing in the form of Ground Rent at the rates specified in Clause 9 below".

**f)** In all cases any tax due under any law shall be payable by the purchaser exclusive of the sale value.

**g)** For all payments received by the auctioneer, he will issue a stamped receipt to the purchaser and the bidder shall in all cases be bound to produce such receipt when called for.

**3. CONDITIONS OF GOODS**

**a)** The goods are sold as and where they lie (i.e. in AS IS WHERE IS condition). The whole of lot or lots shall be taken from the site of the accumulation with all faults and errors in description of otherwise, quantities, qualities, sizes, measurements, numbers and weights as stated in the catalogue are approximate and no warranty or guarantee shall be implied. Stores are sold on the assumption that the bidders have inspected the lots and know what they are buying, whether they have first inspected them or not and the principle of "A Caveat Emptor" will apply. No complaint will be entertained and no reliance must be placed on any description.

**b)** In special cases where the representatives of the Corporation B.E.S. & T. Undertaking proposes to auction any particular item(s) of Stores by weights or numbers and not on lot basis, announcement to that effect shall be made before the lot is put to auction. The bids in such cases shall be for each number of units of weight. The price to be charged shall be calculated on the actual weight or numbers delivered. This however, does not apply to sale in lots as stated in sub Para 3 (a) above.

**4. RISK**

The goods shall be and remain in every respect at the risk of the buyer from acceptance of bid till the removal thereof by the buyer within the stipulated period and the Corporation / B.E.S. & T. Undertaking/Auctioneer shall not be under any liability for its safe custody or Preservation thereof during the said period.

**5. DELIVERY**

**a)** The Chief Materials Manager, or any other officer/employee so authorised, of the B.E.S. & T. Undertaking will issue sale-release order signed by him or an authorised officer/employee to buyers on receipt of him of the whole of the sale price and the taxes payable thereon (if any), "subject to 5 d) below in case of vehicle".

**b)** The goods sold will be removed by the buyer from the site of accumulation within the period specified in the catalogue **i.e. 31 working days from the date of Extended E-auction** or as declared at the time of auction. Deliveries will be made only during working hours on all working days on the presentation by the purchasers to the stock holder the copy of Sale Release Order issued by the Chief Materials Manager of the B.E.S. & T. Undertaking or as stated above. The purchaser will make his own arrangements for transport and he will not be entitled to claim any facilities or assistance for transport from the B.E.S. & T. Undertaking or the Corporation. Whenever materials are sold on weight basis, it shall be binding and obligatory on the part of the purchaser(s) to weigh the empty lorry as well as the loaded lorry on B.E.S. & T. Undertaking weigh bridge only and in return the purchaser/s shall pay Rs. 20/- to the B.E.S. & T. Undertaking for each loaded lorry as weighment charges. However, for any reason or defect, B.E.S. & T. Undertaking weigh bridge is not working on a given day or time, the purchaser/s will bear the charges with transport expenses for the departmental staff of the B.E.S. & T. Undertaking with weigh charges on the nearest weigh bridge of our choice for weighing the materials.

डी) बोलीदाराने खरेदी केलेल्या कोणत्याही संचाचे शिल्लक राहिलेले विक्री मुल्याबाबतचे प्रदान संपूर्णतः विनिर्दिष्टित कालावधीमध्ये केले नाही तर, अशा बाबतीत संचाअंतर्गत सामग्री असेल त्याबाबतची विक्री रद्द करण्यात येईल आणि इसारा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच, बोलीदाराने लिलावांतर्गत ज्या बोलीकरिता बोली दिली होती त्या मालाबाबतचे आणि या बोलीसाठी इसारा ठेव रक्कम प्रदान केली होती रकमेबाबतचे सर्व हक्क बोलीदाराला गमवावे लागतील.

इ) वरील कलम (डी) मध्ये कोणतीही बाब समाविष्ट असली तरी देखील, बेस्ट उपक्रमाचे मुख्य सामग्री व्यवस्थापक, पुढे नमूद केलेल्या कलम ९ मध्ये विनिर्दिष्टित केलेल्या दराने भू-भाड्याच्या स्वरुपामध्ये सामग्रीची साठवण करणे आणि वेअरहाऊसिंग करणे याबाबतच्या खर्चाच्या अधीन ठेवून, अशा स्वरुपातील विलंबाने प्रदान करण्याकरिता यथाप्रमाण तत्त्वावर दरमहा २% (दोन टक्के) याप्रमाणे दंड आकारुन, जर आवश्यक असेल तर, विनिर्दिष्टि कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता विक्रीमूल्याच्या ६६.६७ टक्के एवढी शिल्लक रक्कम प्रदान करण्यास यशस्वी बोलीदाराला मुभा देऊ शकतात.

एफ) या सर्व प्रकरणांच्या बाबतीत कोणत्याही कायद्याअंतर्गत कोणत्याही स्वरुपातील कराचे प्रदान देय असल्यास, खरेदीदाराला विक्रीमूल्य वगळून प्रस्तुत कराचे प्रदान देय असेल

जी) लिलावदाराकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रदानांकरिता हे लिलावदार खरेदीदाराला मुद्रांकित पावती देतील आणि बोलीदाराला सर्व प्रकरणांमध्ये जेव्हा याबाबतीत मागणी करण्यात येईल तेव्हा त्यांना पावती सादर करणे बंधनकारक असेल.

## लिलावांतर्गत ठेवण्यात आलेल्या सामग्रीची स्थिती

ए) लिलावांतर्गत जी सामग्री विक्रीकरिता ठेवण्यात येते ती जशी व ज्या स्थितीमध्ये असेल (म्हणजे,जशी आहे त्या स्थितीमध्ये) त्याप्रमाणे सामग्रीची विक्री करण्यात येते. लिलावांतर्गत जी संचित सामग्री संचामध्ये किंवा संचांमध्ये असते त्या सामग्रीच्या तपशीलामधील दोष आणि त्रुटी यासहित सूचींमध्ये नमूद केल्याप्रमाणे सामग्रीची परिमाणे, दर्जा, आकारमान, मोजमाप, नग आणि वजन या सर्व बाबी अदमासे असतात आणि त्याबाबत कोणत्याही प्रकारची खात्री किंवा हमी नसते. बोलीदारानी लिलावांतर्गत जी सामग्री ठेवण्यात आली आहे त्या सामग्रीचे निरीक्षण केले आहे आणि ते कोणती सामग्री खरेदी करीत आहेत याबाबत त्यांना माहिती आहे हे गृहित धरुन साठा केलेल्या सामग्रीची विक्री करण्यात येते, त्याबाबतीत बोलीदाराने प्रथमतः लिलावांतर्गत ठेवलेल्या सामग्रीचे निरीक्षण केले असेल वा नसेलही आणि याबाबतीत **'सावधगिरीच्या उपाययोजनांचे' ('A Caveat Emptor')** तत्व लागू करण्यात येईल. या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही आणि सामग्रीच्या कोणत्याही तपशीलाबाबत विसंबून राहणे योग्य ठरणार नाही.

बी) बेस्ट उपक्रमाच्या प्रतिनिधींकडून विशेष प्रकरणामध्ये, लिलावांतर्गत कोणत्याही विशिष्ट बाबी/बाबींचा लिलाव संचाच्या आधारे न करता वजन किंवा नग या आधारे करण्याकरिता प्रस्तावित केल्यास त्यानुसार ही बाब लिलावाकरिता संचामध्ये ठेवण्यापूर्वी जाहीर करण्यात येईल. अशा प्रकरणामध्ये बोली प्रत्येक नगाच्या युनिटच्या वजनानुसार असतील. तसेच प्रत्यक्ष वजन किंवा ताबा देण्यात येणा-या नगांची संख्या यांच्या परिगणनेवर किंमत आकारण्यात येईल. तथापि, उपरोक्त परिच्छेद क्र.३च्या उप-परिच्छेद (ए) मध्ये नमूद केल्यानुसार सदर किंमत संचामधील विक्रीकरिता लागू असणार नाही.

## जोखीम

बोलीच्या स्वीकृतीपासून खरेदीदराने सदर सामग्री कराननिविष्ट कालावधीमध्ये स्थलांतरीत करण्यात येईपर्यंत सर्व बाबतीमध्ये प्रस्तुत सामग्रीची जोखीम खरेदीदारावर असेल. महापालिका/बेस्ट उपक्रम/लिलावदार यांच्याकडे सदर कालावधीमध्ये सामग्रीची सुरक्षितता किंवा देखभाल याबाबतीमधील कोणतेही दायित्त्व नसेल.

## सामग्रीचा ताबा देणे :

ए) वाहनांच्या बाबतीत (पुढील उप-परिच्छेद ५(डी)च्या अधीन ठेवून) खरेदीदाराने संपूर्ण विक्रीची किंमत आणि त्यावरील देय असलेला कर (कोणत्याही स्वरुपातील) त्याबाबतचे प्रदान केल्याच्या संदर्भात पावती सादर केल्यानंतर खरेदीदाराला, बेस्ट उपक्रमाच्यावतीने प्राधिकृत करण्यात आलेले मुख्य सामग्री व्यवस्थापक किंवा प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी यांनी स्वाक्षरी केलेले विक्री-आदेश (sale release order) खरेदीदाराला जारी करण्यात येईल.

बी) लिलावाअंतर्गत विक्री करण्यात आलेली सामग्रीची सूचीमध्ये विनिर्दिष्टित केलेल्या कालावधीमध्ये ज्या ठिकाणी सामग्री संचित झाली आहे त्या ठिकाणाहून खरेदीदाराने **विस्तारित इ-लिलावाच्या दिनांकापासून ३१ कामकाजाच्या दिवसामध्ये** किंवा लिलावाच्या वेळी घोषित करण्यात आल्याप्रमाणे, हलविण्यात यावे. बेस्ट उपक्रमाचे मुख्य सामग्री व्यवस्थापक किंवा वर नमूद केल्याप्रमाणे जारी केलेल्या विक्री-आदेशाची (sale release order) प्रत खरेदीदाराने साठाधारकाला सादर केल्यानंतर, कामकाजाच्या दिवशी कामाच्या तासांमध्ये सामग्रीचा ताबा देण्यात येईल. लिलावाअंतर्गत विक्री झालेल्या सामग्रीच्या खरेदीदाराला सामग्रीची वाहतूक करण्याकरिता स्वतः व्यवस्था करावी लागेल आणि बेस्ट उपक्रम किंवा महानगरपालिका यांच्याकडून वाहतूक करण्याकरिता कोणतीही सुविधा किंवा सहाय्य याकरिता दावा करण्यास ते पात्र ठरणार नाहीत. जेव्हा-जेव्हा सामग्रीची वजनाच्या आधारे विक्री करण्यात येते, तेव्हा खरेदीदाराने रिकामी मालमोटारीचे त्याचप्रमाणे सामग्री भरलेल्या मालमोटारीचे केवळ बेस्ट उपक्रमाच्या वजन काट्यावर वजन करणे बंधनकारक आणि अनिवार्य आहे. या बदल्यात, खरेदीदाराला वजन आकार म्हणून सामग्री भरलेल्या प्रत्येक मालमोटारीकरिता बेस्ट उपक्रमाकडे रु.२०/- एवढे आकार प्रदान करावे लागेल. तथापि, बेस्ट उपक्रमाच्या वजन काट्यावर कोणतेही कारण किंवा दोष यामुळे वजन काटा दिलेल्या दिवसामध्ये किंवा वेळेमध्ये कार्यरत नसेल तर, सामग्रीचे वजन करण्याकरिता जवळील वजन काट्यावर बेस्ट उपक्रमाच्या निवडीनुसार, विभागीय सेवकवर्ग सदस्यांकरिता जाण्याचा-येण्याचा प्रवास खर्च व वजन काटयाची आकारणी बोलीदाराने स्वतःच्या खर्चाने करावी लागेल.

**c)** If the original buyer wish to take delivery of the stores purchased through a representative, he must authorised the latter by a Letter Of Authority which shall be presented to the officer of the B.E.S.& T. Undertaking in whose charge the stores are held. Such officer may in his entire discretion decline to act on any such authority and it shall, in all cases be for the buyer to satisfy such officer that the authority in genuine. Delivery by proxy will be at the purchaser's sole responsibility and risk and no claim shall lie against the Corporation/B.E.S.&T. Undertaking/Auctioneer on any account whatsoever if delivery is affected to the wrong person.

**d)** The possession of the vehicle will not be granted to the purchaser unless a valid towing permission or a cancellation of registration of the vehicle is obtained from the R.T.O.'s office which shall be produced to the B.E.S. & T. Undertaking for verification. The purchaser(s) shall also be required to deposit a reasonable amount, if necessary, for each vehicle, with the Corporation/B.E.S. & T. Undertaking in addition to the bid amount returnable only after production of relevant papers from R.T.O. to the effect that the buses/vehicles have been transferred on their names.

**6. NON-DELIVERY**

**a)** Where goods are sold in lots, and not by numbers or units of weight in the event of the lot or lots being found to be deficient in quantity, quality, size, measurement, number and weight, as stated in the catalogue, purchaser shall have no claim against the B.E.S. & T. Undertaking or against the auctioneer for refund of the whole or any part of the purchase money or for the loss or profit, interest, damages or otherwise.

**b)** Where stores are sold by weight or number and not on basis of lots and the purchaser fails to obtain the delivery of the whole or the portion of the stores sold, he shall not be entitled to make any claim, other than for proportionate refund of the value of the undelivered quantity. He shall not be entitled to claim any damages, loss or profit, interest or compensation on any other account.

**7. RE-SALE**

Re-sale will not be recognised and Release Orders will be made out in the name of the actual purchasers only.

**8. CHARGES FOR FAILURE TO KEEP FIXED APPOINTMENT shall be as under**
**Rs. 1,000/= per failure irrespective of material cost.**

**9. FAILURES TO TAKE DELIVERY AFTER PAYMENT**

**a)** Where the scrap materials are sold on lot basis : Ground rent will be charged @2% per day of the full value of the lot irrespective of the quantity already removed, subject to a minimum of Rs. 20/= per day for the period between the expiry of free time for taking delivery and for a maximum of only 30 days. Thereafter, any payment already made by the bidder towards the cost of the material will be forfeited and the material will be put for re- auction.

**b)**Where the scrap materials are sold on weight/nos. : Ground rent will be charged @2% of the proportionate value of the unremoved quantity subject to a minimum of Rs. 20/= per day for the period between the expiry of free time for taking delivery and for a maximum of only 30 days. Thereafter, any payment already made by the bidder towards the cost of the material will be forfeited and the material will be put for reauction.

Such ground rent or any other charges as may have been incurred by the B.E.S. & T. Undertaking shall be recovered from the purchaser before the goods or materials are allowed to be removed. Provided, further that if the purchaser is making slow progress with his contract or if the B.E.S. & T. Undertaking considers that he has failed to fulfill the contract within time specified in the condition of sale, it will be lawful for the B.E.S. & T. Undertaking to cancel the whole contract or such portion thereof as may not have been completed and the B.E.S. & T. Undertaking shall be at all liberty to dispose of the goods or materials in any manner at the risk and expenses of the purchaser. The earnest money or sale value shall be forfeited and the bidder shall forfeit all his rights in the goods.

**10.** In the event of the auctioneer being of opinion that the bidders are forming a ring and fair prices are not being realised for stores offered in auction, the auctioneer may stop the sale with the consent of the Officer of the B.E.S. & T. Undertaking superintending the sale.

**11.** The buyer shall be responsible for any damage that may be done to the premises in taking down or removing the lot or lots bought by him. The Corporation B.E.S. & T. Undertaking or its representative may, at his option, arrange to make good such damages departmentally and the buyer shall pay the same on demand.

सी) मूळ खरेदीदाराला त्याच्या प्रतिनिधीच्याद्वारे खरेदी केलेल्या सामग्रीचा ताबा घ्यावयाचा असल्यास, त्यांनी ज्याच्याकडे सामग्रीचा ताबा देण्याकरिताचा कार्यभार आहे अशा उपक्रमाच्या अधिका-याकडे प्राधिकारपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर अधिकारी त्याच्या संपूर्ण अधिकारामध्ये अशा प्राधिकारपत्रावर निर्णय घेईल. तसेच, खरेदीदाराने सादर केलेले प्राधिकार पत्र अस्सल/सत्य आहे याबाबतची खातरजमा खरेदीदाराला करावी लागेल. सामग्रीचा ताबा प्रतिनिधीमार्फत घेण्याची संपूर्ण जबाबदारी आणि जोखीम खरेदीदाराची असेल आणि चुकीच्या व्यक्तीकडे सामग्रीचा ताबा देण्यात आल्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीबाबतचा दावा खरेदीदाराला, महापालिका/बेस्ट उपक्रम/लिलावदार यांच्याविरुध्द करता येणार नाही.

डी) मार्ग परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयामधून वाहन टोविंग (towing) नेण्याचा वैध परवाना किंवा वाहनाची नोंदणी रद्द केल्याचा परवाना प्राप्त केल्याशिवाय वाहनाचा ताबा देण्यात येणार नाही. सदर परवाना बेस्ट उपक्रमाकडे पडताळणीकरिता सादर करावा लागेल. तसेच, खरेदीदाराला बसगाडी/वाहने त्यांच्या नावावर स्थानांतरीत करण्यात आली आहेत. याबाबत मार्ग परिवहन अधिकारी यांच्याकडून संबंधित कागदपत्रे सादर केल्यानंतरच परत मिळणा-या बोलीच्या रकमेव्यतिरिक्त आवश्यक असल्यास प्रत्येक वाहनाकरिता वाजवी रकमेची ठेव महापालिका/बेस्ट उपक्रम यांच्याकडे ठेवावी लागेल.

**<u>सामग्रीचा ताबा न घेणे</u>**

ए) ज्यावेळी सामग्रीची विक्री युनिटच्या वजनाच्या नगांऐवजी संचामध्ये होते त्यावेळी सूचीमध्ये नमूद केल्यानुसार परिमाण, दर्जा, आकारमान, मोजणी, नग आणि वजन यांच्यामध्ये तफावत आढळल्यास, खरेदीदाराला याबाबतीतील संपूर्ण परतावा किंवा खरेदीच्या रकमेचा अंश भाग किंवा नफा आणि तोटा, व्याज, नुकसान किंवा अन्य बाबतीत बेस्ट उपक्रम किंवा लिलावदाराविरुध्द कोणताही दावा करता येणार नाही.

बी) ज्यावेळी सामग्रीची विक्री संचाच्याऐवजी वजन किंवा नगांमध्ये करण्यात येते आणि अशावेळी खरेदीदाराला विक्री करण्यात आलेल्या सामग्रीचा संपूर्ण किंवा अंश भागाचा ताबा घेण्यात अपयश आल्यास, ताबा न देण्यात आलेल्या परिमाणाच्या मुल्याच्या यथाप्रमाण परताव्याव्यतिरिक्त कोणताही दावा करता येणार नाही. तसेच त्यांना कोणतेही नुकसान, नफा किंवा तोटा, व्याज किंवा कोणत्याही कारणांमुळे भरपाई याकरिता दावा करता येणार नाही.

**सामग्रीची पुर्न विक्रीः**

सामग्रीची पुर्न विक्री करण्याकरिता मान्यता देण्यात येणार नाही आणि केवळ प्रत्यक्ष खरेदीदाराच्या नावाने आदेश (Release Orders) काढण्यात येईल.

**सामग्रीचा ताबा घेण्याकरिता ठरलेल्या भेटीच्या वेळेस भेट न झाल्यास, सामग्रीची किंमत विचारात न घेता प्रत्येक प्रसंगी रु. १०००/- एवढे आकार लागू होतील.**

**प्रदान केल्यानंतर सामग्रीचा ताबा घेण्यात न आल्यास**

ए) <u>संचाच्या स्वरुपात जेथे मोडीत सामग्रीची विक्री करण्यात येतेः</u> सामग्रीचा ताबा घेण्याकरिताचा नियत कालावधी समाप्त झाल्यानंतर आणि कमाल ३० दिवसांचा कालवधी यादरम्यानच्या कालावधीकरिता प्रतिदिन किमान रु. २०/- या अधीन ठेवून, ज्या सामग्रीचे परिमाण यापूर्वीच हलविण्यात आले आहे किंवा नाही ही बाब विचारात न घेता संचाच्या संपूर्ण मुल्याच्या प्रतिदिन २ टक्के या दराने भू-भाडे आकारण्यात येईल. तद्नंतर, लिलावाअंतर्गत सामग्रीच्या मुल्याच्या बाबतीतील बोलीदाराने यापूर्वी कोणतेही केलेले प्रदान जप्त करण्यात येईल आणि अशा प्रकारच्या सामग्रीचा पुन्हा लिलाव करण्याकरिता ठेवण्यात येईल.

बी) <u>जेथे मोडमाल सामग्रीची वजन/नगांवर विक्री करण्यात येतेः</u> सामग्रीचा ताबा घेण्याकरिताचा नियत कालावधी समाप्त झाल्यानंतर आणि कमाल ३० दिवसांचा कालावधी यादरम्यानच्या कालावधीकरिता प्रतिदिन किमान रु. २०/- या अधीन ठेवून, ज्या सामग्रीचे परिमाण हलविण्यात आले नाही त्या परिमाणाच्या यथाप्रमाण मुल्याच्या २ टक्के या दराने भू-भाडे आकारण्यात येईल. तद्नंतर, लिलावाअंतर्गत सामग्रीच्या मुल्याच्या बाबतीतील बोलीदाराने यापूर्वी कोणतेही केलेले प्रदान जप्त करण्यात येईल आणि त्या सामग्रीचा पुन्हा लिलाव करण्याकरिता ठेवण्यात येईल.

अशा स्वरुपातील भूभाडे किंवा कोणतेही अन्य आकार, ज्याकरिता बेस्ट उपक्रमाला खर्च करावा लागला आहे त्याबाबतीत बाबी किंवा सामग्री हलविण्यास मुभा देण्यापूर्वी खरेदीदाराकडून उपक्रमाने केलेल्या खर्चाची वसुली करण्यात येईल. याबाबतीत अशी तरतूद करण्यात आली आहे की, खरेदीदाराकडून कंत्राटाच्या बाबतीत फारच मंद प्रगती असेल तर किंवा बेस्ट उपक्रमाला अशी खात्री झाली की, खरेदीदार विनिर्दिष्टीत कालावधीमध्ये कंत्राट पूर्ण करण्यास अपयशी ठरला आहे अशी वेळी बेस्ट उपक्रम संपूर्ण कंत्राट वा कंत्राटाचा काही भाग जो अपूर्ण आहे तो रद्द करु शकेल आणि खरेदीदाराच्या जोखमीने व खर्चाने माल किंवा सामग्रीची विल्हेवाट लावण्यास उपक्रम स्वतंत्र असेल. या बाबतीत इसारा रक्कम किंवा विक्री मूल्य जप्त करण्यात येईल आणि बोलीदार माल वा सामग्रीच्या बाबतीत सर्व हक्क गमावून बसेल.

लिलावदाराची जर अशी धारणा असेल की, बोलीदार कंपू करीत असून लिलावातील संग्रहित सामग्रीला वाजवी व योग्य किंमत प्राप्त होत नाही तर अशा प्रसंगी लिलावदार, लिलावाअंतर्गत ज्या सामग्रीची विक्री करण्यात येते त्यावर देखरेख करणा-या बेस्ट उपक्रमाच्या अधिका-याच्या सहमतीने पुढील विक्री थांबवू शकतात.

खरेदीदाराने संच किंवा संचांअतर्गत खरेदी केलेली सामग्री उपक्रमाच्या जागांमधून घेऊन जाताना किंवा हलवितांना उपक्रमाच्या जागेला जर कोणत्याही प्रकारची हानी झाली तर खरेदीदार त्याकरिता जबाबदार राहील. बेस्ट उपक्रम, त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सवडीनुसार अशा नुकसानभरपाई बाबत विभागीय व्यवस्थेद्वारा परिगणना करेल आणि अशा बाबतीत खरेदीदार मागणीप्रमाणे नुकसानभपाईच्या बाबतीतील प्रदान करेल.

एखादी विशिष्ट बाब किंवा बाबींकरिता उच्चतम बोली प्राप्त झाल्यास, प्रस्तुत प्रकरण महापालिका किंवा बेस्ट उपक्रमाला वा यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीना जेव्हा व जेथे आवश्यक आहे त्याप्रमाणे ही बाब विचारांत घेऊन अंतिम मंजुरीसाठी संदर्भित करण्यात येते, या बाबतीत महापालिका, बेस्ट उपक्रम आपला हक्क राखून ठेवीत आहे.

**12.** The Corporation B.E.S. & T. Undertaking reserves the right if the highest bid received for particular item or items be referred to the Corporation or the B.E.S.& T. Undertaking or its duly authorised agent for final sanction, where and whenever this is considered necessary.

**13.** The Corporation B.E.S. & T. Undertaking reserves the right of withdrawing from the sale or adding to any lot or lots advertised in the catalogue prior to the acceptance of any bid for such lot/lots in an auction without assigning any reasons.

**14.** The Chief Materials Manager, the Officer superintending the auction, B.E.S. & T. Undertaking reserves the right to sell the items individually or in lots or in any order.

**15.** No picking, sorting, cutting or breaking up of the goods or materials sold will be permitted except in certain special circumstances where sanction for such permission has been accorded and specified in writing at the time of auction by the B.E.S. & T. Undertaking or its representative.
Such permission will be accorded on the distinct understanding that the delivery order for such lot or lots must be obtained for the full quantity before picking, sorting, cutting or breaking up commences.

**16.** The delivery of the material either in part or full is subject to being withheld, if required, by the B.E.S. & T. Undertaking at any stage before the actual delivery without any commitment.

**17. Every bidder must submit the copy of PAN Card before commencement of e-auction with the Auctioneers**.

***********

**Ashvin and Co. - Tel. : 2610 7515, 2613 3600.**
**Oshiwara Scrap Yard - BEST Oshiwara Scrap Yard, Extension to Link Road, Adjacent to Goregaon Bus Depot Goregaon (West), Mumbai – 400104.**
**Tel. : 2676 1829, 2676 1845. 26761390.**

# Important instructions to the participating Members

1. Bidders are required to pay Caution Money Deposit (CMD) in the form of Demand Draft / Pay Order drawn in favour of The **B.E.S. & T. Undertaking, payable at Mumbai**, as mentioned in the catalogue for sections to which they intend to bid.

2. Unless Caution Money Deposit (CMD) is paid in advance, you will not be able to enter the e-Auction Room.

3. **Every bidder should ensure that his bid reaches the server before the closing time.**

4. It may please be noted that complaints regarding non availability of electricity internet connectivity, etc, will not be entertained and our decision will be final and binding on the bidders.

5. Further in view of the above, every bidder is requested to avoid last minute bidding and give his bid at least Ten (10) minutes before the closing time.

6. Unsold lots of all Sections will be put up for sale in Extended e-auction immediately on the same day between 15:00 hrs to 15:30 hrs and the minimum bid shall start from the highest bid received for the particular unsold item in the previous auction.

# HOW TO BID
## Please visit on website www.ashvinauctioneers.com

१३. लिलावांतर्गत संच/संचांकरिता कोणतीही बोली स्वीकारण्यापूर्वी, सूचीमध्ये (कॅटलॉग) जाहिरात केलेल्या संच किंवा संचांमधील बाबी कोणतेही कारण नमूद न करता अशा संच किंवा संचांमधील बाबी विक्रीपासून काढून घेणे किंवा भर घालणे यासाठी महापालिका, बेस्ट उपक्रम आपला हक्क राखून ठेवत आहे.

१४. लिलावामध्ये बाबी स्वतंत्रपणे वा संचाच्या स्वरुपात अथवा कोणत्याही प्रकारे विकण्याच्या संदर्भात मुख्य सामग्री व्यवस्थापक, लिलाव प्रकिया पार पाडणारा अधिकारी व बेस्ट उपक्रम आपला हक्क राखून ठेवत आहे.

१५. लिलावांतर्गत ज्या सामग्रीची विक्री करण्यात येते त्या बाबतीत ती सामग्री गोळा करणे, निवड करणे, कापणे किंवा सामग्रीची विभागणी करण्याकरिता बेस्ट उपक्रम किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडून लिलावाच्या वेळी परवानगी घेण्यात आली आहे आणि त्यानुसार लेखी स्वरुपात विनिर्दिष्टित करण्यात आले आहे अशा विशेष स्थितीव्यतिरिक्त अन्य बाबतीत लिलावांतर्गत विक्री झालेली सामग्री गोळा करणे, निवडणे, कापणे किंवा सामग्रीची विभागणी करणे याकरिता परवानगी देण्यात येणार नाही.

१६. उपक्रमाच्या आवश्यकतेप्रमाणे कोणत्याही टप्प्यावर प्रत्यक्ष सामग्रीचा ताबा देण्यापूर्वी कोणत्याही बंधनाशिवाय ताबा रोखून धरण्याच्या अधीन ठेवून, खरेदीदाराला सामग्रीचा अंशभाग किंवा सामग्रीच्या संपूर्ण परिमाणाचा ताबा देण्यात येतो.

१७. इ-लिलाव सुरु होण्यापूर्वी प्रत्येक बोलीदाराने आपल्या आयकर कायम खाते क्रमाकाच्या पत्राची (**PAN Card**) प्रत लिलावदाराकडे जमा करणे आवश्यक आहे.

**अश्विन ॲण्ड कंपनी – दूरध्वनी : २६१० ७५१५, २६१३ ३६००.**

**ओशिवरा मोडमाल आवार** – बेस्ट ओशिवरा मोडमाल आवार, लिंक मार्ग विस्तारीत,
गोरेगाव बस आगारालगत, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० १०४.
**दूरध्वनी २६७६ १८२९, २६७६ १८४५, २६७६ १३९०.**

## सहभागी होणा-या बोलीदारांकरिता महत्वाची सूचना

१. लिलावांतर्गत उपविभागांमध्ये सामग्रीचा लिलाव करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सामग्रीकरिता बोलीदारांनी बोली देण्याकरिता इच्छा व्यक्त केली असेल त्याबाबतीत सूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, बेस्ट उपक्रमाच्या नावे मुंबई येथे देय असलेले दर्शनी धनाकर्ष/प्रदानादेश या स्वरुपामध्ये तारण धन ठेव रक्कम (सीएमडी) बोलीदाराने प्रदान करणे आवश्यक आहे.

२. तारण धन ठेव रकमेचे (सीएमडी) आगाऊ प्रदान केल्याशिवाय, कोणत्याही बोलीदाराला इ-लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

३. **प्रत्येक बोलीदाराने बोलीची वेळ समाप्त होण्यापूर्वी त्याच्या बोलीची सर्व्हरमध्ये नोंद झाली आहे किंवा नाही याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे.**

४. येथे कृपया अशी नोंद घेण्यात यावी की, इलेक्ट्रिसिटी इंटरनेट कनेक्टिव्हिटीची अनुउपलब्धता इत्यादी बाबतीतील तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही आणि या संदर्भात उपक्रमाचा निर्णय अंतिम राहिल तसेच सर्व बोलीदारांकरिता हा निर्णय बंधनकारक राहिल.

५. वरील स्थिती विचारात घेऊन, प्रत्येक बोलीदाराने, अखेरच्या क्षणापर्यंत बोली सादर करण्याचे टाळावे आणि बोलीची वेळ समाप्त होण्यापूर्वी कमीत कमी दहा (१०) मिनिटे अगोदर बोलीदाराने त्यांची बोली सादर करण्यासाठी प्रत्येक बोलीदाराला विनंती करण्यात येत आहे.

६. **लिलावांतर्गत सर्व विभागांमध्ये सामग्रीचा लिलाव करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सामग्रीपैकी ज्या विभागातील सामग्रीची लिलावांतर्गत विक्री झाली नाही अशा सर्व विभागातील विक्री न झालेल्या संचांचा त्याच दिवशी १५.०० ते १५.३० या दरम्यानच्या वेळेत पुन्हा: विस्तारीत इ-लिलाव करण्यात येईल आणि मागील लिलावामध्ये विक्री न झालेल्या विशिष्ट बाबीकरिता जी उच्चतम बोली प्राप्त झाली त्या बोलीपासून कमीत कमी बोली सुरुवात करण्यात येईल.**

## बोली कशी सादर करावी, याकरिता,

www.ashvinauctioneers.com **या संकेतस्थळाला कृपया भेट द्या.**